दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १६ वे • अंक ५६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२० मे २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# चक्रीवादळांचा मुकाबला करण्यासाठी कायमस्वरुपी नियोजन करा : ऊर्जामंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**जागतिक वातावरणात होणारे बदल लक्षात घेता दरवर्षी मान्सूनच्या पूर्वी चक्रीवादळ येण्याची शक्यता गृहीत धरून या वादळाने कमीतकमी नुकसान व्हावे आणि वादळ येऊन गेल्यानंतर वीज पूरवठा पुन्हा सुरळीत करण्यासाठी कायमस्वरूपी नियोजन आणि कार्यप्रणाली तयार करण्याचे आदेश राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले आहेत.**



तौक्ते चक्रीवादळ येऊन गेल्यावर झालेल्या नुकसानीचा आणि मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी एक बैठक आज ऊर्जामंत्री यांच्या मंत्रालयातील दालनात आयोजित करण्यात आली होती. यावेळेस बोलताना त्यांनी हे आदेश दिले. गेल्यावर्षी निसर्ग चक्रीवादळ आले,यावर्षी तौक्ते चक्रीवादळ आले. जागतिक वातावरण बदल आणि इतर भौगोलिक कारणामुळे दरवर्षी असे चक्रीवादळ येण्याची शक्यता आहे. चक्रीवादळाचा इशारा येईल आणि मग आपण नियोजन करू यापेक्षा आता दरवर्षी मान्सूनच्या तोंडावर चक्रीवादळ येणार हे गृहीत धरून नियोजन करा.

वादळामुळे आपले कमीतकमी नुकसान होईल आणि वीज पुरवठा तात्काळ पूर्ववत करता येईल यासाठी कायमस्वरूपी नियोजन व आदर्श कार्यप्रणाली (एसओपी) तयार करा, असे निर्देश त्यांनी आज बैठकीत दिले.

दरवर्षी पाऊस आल्यावर अनेक ठिकाणी वीज जाते. हे टाळण्यासाठी पावसाळी पूर्व तयारीचा भाग म्हणून पाऊस झाल्यावरही वीज पुरवठा कायम रहावे यासाठी आपत्कालीन योजना तयार करा,अशा सूचना त्यांनी केल्या तसेच एखाद्या ठिकाणी वीज गेल्यास तिथे वीज पुरवठा करण्याचे अन्य पर्याय काय असतील याचाही आराखडा तयार करा,असे डॉ. राऊत म्हणाले. पालघरमधील वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या आघाडीवर नेमकी काय प्रगती आहे याबद्दल त्यांनी आजच्या बैठकीत विशेष चर्चा केली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवर केवळ विसंबून न राहता त्यांनी पालघरचे पालकमंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनीवर संपर्क साधून ते वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या कामाबाबत समाधानी आहेत का, याची चौकशी केली. भुसे यांनी दिलेल्या सुचनांवर कार्यवाही करण्याचे आदेशही त्यांनी दिले. पालघरमध्ये महावितरणकडे झाडे कापण्याच्या मशीन्स नसल्याच्या तक्रारीवरून त्यांनी अधिकाऱ्यांना जाब ही विचारला.

तौक्ते वादळ व यापूर्वी आलेल्या निसर्ग चक्रीवादळात महावितरण व महापारेषणच्या सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी चांगले काम केले आहे. त्याबद्दल यापूर्वीच मी सर्वांचे अभिनंदन करतो, अशा शब्दांत त्यांनी सर्वांचे कौतूक केले. आकडेवारी वरून खंडित झालेला वीज पुरवठा आपण लवकरात लवकर पूर्ववत करतो हे जरी खरे असले तरी बऱ्याच ठिकाणी फिल्डवर्कवर वेगळी परिस्थिती असते. याबाबत आमदार, खासदार व इतर माहिती अधिकार कार्यकर्ते व पत्रकार आपल्या फिल्डवरील अधिकाऱ्यांना फोन व दूरध्वनी करीत असतात, परंतू काही अधिकारी फोनही उचलत नाहीत व दाद देत नाहीत, अशा तक्रारी मला प्राप्त झाल्या आहेत, अशा शब्दांत त्यानी काही अधिकाऱ्यांबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यातील काही उदाहरणे नमुन्या दाखल मी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना देत आहे. त्यावर चौकशी करून १५ दिवसात अहवाल सादर करावा असे निर्देशही त्यांनी दिले.

# विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणीस यांची रोहा तालुक्यात वादळात झालेल्या नुकसानीची पाहणी

**चक्रीवादळाचा विचार करुन कामाचा दर्जा सुधारणे आवश्यक : देवेंद्र फडणीस**



**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्याला निसर्ग चक्रिवादळ व तोक्ते चक्रिवादळाने झोडपल्याने मच्छिमार, शेतकरी, घरांचे व शासकीय इमारतींचे फार मोठे नुकसान झाले. मागच्या चक्रिवादळात मेढा येथील आयुष्यामान भारत या इमारतीचेही फार मोठे नुकसान झाले होते. आता तोक्ते चक्रिवादळात पुन्हा या इमारतीचे छत उडून गेले असल्याने शासकीय इमारतीचे मोठे आर्थिक नुकसान झाले. या इमारतीचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. यावेळी बोलताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणीस म्हणाले कि, कोकणाला सतत चक्रिवादळाचा तडाखा बसत आहे. त्यामुळे यापुढे वादळाचा विचार करुन बांधकामाचा दर्जा बदलणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. या पाहणी दरम्यान विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर, युवानेते वैकुंठ पाटील, युवामोर्चा अध्यक्ष अमित घाग, राजेश मपारा, तालुका अध्यक्ष सोफान जांभेकर, मारुती देवरे, समन्वय समिती सदस्य संजय कोणकर, सुनिल देशमुख व कार्यकर्ते उपस्थीत होते.

समुद्राला लागूनच कोकण किनारपट्टीचा भाग असल्याने किनारपट्टी भागात बऱ्याचदा मोठे आर्थिक नुकसान होते. गेल्यावर्षी ३ जून रोजी झालेल्या निसर्ग चक्रिवादळ व आत्ताचा १७ मे रोजी झालेला तोक्ते चक्रीवादळामुळे रोहा तालुक्यातील शासकीय इमारतींचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर घरे व बागायतदारांचे फार मोठे नुकसान झाले आहे. आता निसर्ग चक्रीवादळाप्रमाणे तोक्ते चक्रीवादळात नुकसान झालेल्यांना मदत मिळावी अशी मागणी रोहा तालुक्यातील नुकसानग्रस्तांची आहे.

मेढा येथील आयुष्यमान भारत या शासकीय इमारतीचे दोन्ही वादळात फार मोठे आर्थिक नुकसान झाले. मात्र या इमारतीच्या बाजुला असलेल्या स्मशान शेडचे काहीही नुकसान झाले नाही, त्यामुळे या इमारतीच्या कामाच्या दर्ज्याबाबत उपस्थीत नागरिकांनी खेद व्यक्त केला. कामाचा दर्जा चांगला नसल्याची चर्चा कानावर येत होती. त्याचप्रमाणे या इमारतीला वापरले गेलेले छताचे पाईप व पत्रे हलक्या प्रतीचे असल्याचे दिसून आले.

# रायगड जिल्ह्यातील अत्यावश्यक दुकाने पूर्ण वेळ राहणार सुरु

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोरोनामुळे जिल्ह्यात लॉकडाऊन आहे. अत्यावश्यक सेवेतील दुकानांसह अन्य काही दुकाने आता पूर्ण वेळ सुरु ठेवण्याची परवानगी जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

रायगड जिल्हाधिकारी यांनी याबाबतचे एक पत्रक आज (१९ मे) जारी केले आहे. त्यानुसार किराणा, भाजीची दुकाने, फळ विक्रेते, चिकन, मटण, मासळी विक्रेते, रेशन दुकानदार, फ्रेब्रिकेशनची कामे करणारी अस्थापने, शेतीची अवजारे व या संबंधित दुकाने, पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी कामे आदी. तसेच सिमेंट पत्रे, ताडपत्री, विद्युत उपकरणे तसेच हार्डवेअरची दुकाने या निर्बंधातून वगळण्यात आली आहेत. सध्या ही दुकाने सकाळी अकरा नंतर बंद करण्यात येत आहेत. मात्र नवीन आदेशानुसार आता ही दुकाने पूर्णवेळ उघडी ठेवता येणार आहेत.

## संक्षिप्त...

### सामाजिक संस्थांच्या सहकार्यामुळे कोरोनाविरोधी लढ्याला मोठी ताकद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यावरील कोरोना संकटाचा सामना करताना सर्वांची एकजूट आणि सामाजिक संस्थांचे सहकार्य महत्वाचे आहे. लंडन येथील अरविंद शाह तसेच मुकुल माधव फाऊंडेशन यांच्यावतीने राज्यातील कोविड रुग्णालये, कोविड सेंटरसाठी देण्यात आलेले व्हेन्टिलेटर्स, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर आदी वैद्यकीय उपकरणांमुळे राज्याच्या कोरोनाविरोधी लढ्याला ताकद मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती सभागृहात डॉ. अरविंद शाह (लंडन) तसेच मुकुल माधव फाऊंडेशन यांच्यावतीने कोविड रुग्णालये, कोविड सेंटरसाठी देण्यात येणाऱ्या व्हेन्टिलेटर्स, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर आदी वैद्यकीय उपकरणांचे वितरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी विभागीय सहनिबंधक आर. सी. शाह तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, डॉ. अरविंद शाह, मुकुल माधव फाऊंडेशन, ब्रिटिश असोसिएशन ऑफ फिजिशियन ऑफ इंडियन ओरिजिन यांनी देशातील, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील रुग्णांना पाठविलेली मदत कोरोनाविरोधी लढ्याला ताकद देणारी आहे. ही वैद्यकीय मदत रुग्णापर्यंत व्यवस्थित पोहोचेल याबाबतची काळजी घेण्याची सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली. तसेच लंडन येथील डॉ. अरविंद शाह यांच्याशी व्हीसीद्वारे संवाद साधून त्यांचे आभार मानले, अभिनंदन केले.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५0 बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९८२०३५५३४६**

# आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री ना.विजय वडेट्टीवार रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



राज्याचे इमाव बहुजन कल्याण विभाग, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री ना.विजय वडेट्टीवार हे दि.२० मे २०२१ रोजी रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा सविस्तर दौरा पुढीलप्रमाणे...

गुरुवार दि. २० मे २०२१ रोजी सकाळी ०९.१० वा. पुणे विमानतळ येथे आगमन व शासकीय वाहनाने माणगाव, जि.रायगडकडे प्रयाण. ( मार्ग पुणे- मुळशी- माणगांव). दुपारी १२.३० वा. माणगाव, जि.रायगड येथे आगमन व तौक्ते वादळामुळे माणगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाचा पाहणी दौरा. दुपारी ०२.०० वा. म्हसळा जि.रायगड येथे आगमन व तौक्ते वादळामुळे म्हसळा तालुक्यातील नुकसानग्रस्त भागांचा पाहणी दौरा. दुपारी ०२.३० वा. राखीव. दुपारी ०३.३० वा. श्रीवर्धन, जि.रायगड येथे आगमन व तौक्ते वादळामुळे श्रीवर्धन तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाचा पाहणी दौरा. सायं. ०४.०० वा. रायगड जिल्ह्यात तौक्ते वादळामुळे झालेल्या नुकसानाची आढावा बैठक.(स्थळ:- मध्यवर्ती प्रशासकीय भवन, श्रीवर्धन, जि.रायगड).सायं. ४.३० वा.पत्रकार परिषद (स्थळ: मध्यवर्ती प्रशासकीय भवन, तळमजला, श्रीवर्धन, जि. रायगड). सायं. ०६.०० वा. श्रीवर्धन येथून शासकीय वाहनाने रत्नागिरी कडे प्रयाण.

# 'एलॲण्डटी'च्या अंडरपास खंदकात लालमातीचे ढिगारे कोसळू लागले!

**कशेडी घाट आणि पोलादपूरचा राष्ट्रीय महामार्ग यंदा होणार चिखलमय**

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील पोलादपूर शहरातील अंडरपास रस्त्यावर लालमातीचे ढिगारे यंदाच्या पावसाळ्यात कोसळून पोलादपूरची वाट बिकट होईल, असे भाकित प्रस्तुत प्रतिनिधीने केल्यानंतर त्याची प्रचिती सध्या सुरू असलेल्या अवकाळी पावसादरम्यानच आली असून राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाने किंवा नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडियाने या सर्व परिस्थितीवर लक्ष न ठेवल्यानेच पोल-ादपूर शहराची वाट बिकट होऊन कशेडी घाटातही नजिकच्या काळात पडझडीला सुरूवात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.




वीर ते कातळी भोगाव दरम्यानच्या चौपदरीकरण कामाची पोलादपूर तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाची ठेकेदार कंपनी 'एलॲण्डटी'च्या कामावर राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाने किंवा नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडियाने सपशेल डोळेझाक सुरू केली आहे. त्यामुळे तटस्थ एजन्सीमार्फत आता या कामाचे टेक्नीकल ऑडीट होण्याची गरज असून एनएचआयइ ही थर्ड पार्टी कन्सल्टंट असूनही कामावर देखरेख न ठेवता कार्यालयामध्येच बसून सर्व बिले बिनदिक्कीत मंजूर करीत असल्यानेच महाड ते पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटातील भुयारीमार्गापर्यंतच्या रस्त्याबाबत गुणवत्ता व ..../२

# वेलशेत ते आमडोशी फाटा रस्ता पहिल्याच पावसात उखडण्यास सुरूवात

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

गेल्या चार - पाच वर्षांपासून दुरूस्ती व डांबरीकरणाच्या प्रतीक्षेत असलेला वेलशेत फाटा वरवठणे मार्गे आमडोशी फाटा हा रस्ता डांबरीकरणा नंतर पहिल्याच पावसात उखडण्यास सुरूवात झाली आहे. त्यामुळेच या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप भाजपाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे यांनी केला आहे. याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम खात्याने योग्य ती दखल घेण्याची मागणीही होत आहे.

सन २०१६ पासून नागोठणे विभागातील वेलशेत फाटा, वरवठणे ते आमडोशी फाटा पर्यंतचा सुमारे चार किलोमीटरचा रस्ता डांबरीकरणाच्या प्रतीक्षेत होता. या रस्त्याचे काम होण्यासाठी किशोर म्हात्रे यांनी बांधकाम खात्याच्या अलिबाग विभागाकडे पाठपुरावा केला होता. तसेच स्थानिक भाजपा कार्यकर्त्यांनी पेण सुधागड मतदार संघांचे आमदार रविशेठ पाटील यांचीही भेट घेतली होती. त्यानंतर आमदार पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून वरवठणे ते आमडोशी फाट्यापर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरणाला सुरुवात झाल्यामुळे प्रवासीवर्ग व स्थानिक ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले होते. परंतु हे समाधान जास्त दिवस टिकले नाही. कारण पंधरा दिवसातच रस्त्यावर टाकलेले डांबर निघून जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर किशोर म्हात्रे व वाहन चालकांनी संताप व्यक्त केला आहे. ..../२



# विज ग्राहकांना सुविधा देण्यासाठी महावितरण तळा शाखेचे विभाजन गरजेचे

**दै.रायगड नगरी । तळा**

महावितरण कंपनीने तत्काळ सेवा देण्यासाठी प्रयत्न सुरू केले असले तरी तळा तालुका भौगोलिक दृष्ट्या खुप मोठा आहे. सदर तालुक्यात महावितरण कंपनीचे एकच शाखा कार्यालय आहे संपुर्ण तळा तालुक्यात बारा हजार ग्राहक आहेत. तालुक्यात ६६ गावे असुन २२ वाड्या आहेत. दिवसेंदिवस ग्राहकांची संख्या वाढतच आहे त्यामुळे ग्राहकांना उत्तम सेवा मिळण्यासाठी व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने तळा शाखा कार्यालयाचे विभाजन करणे गरजेचे आहे.

तळा तालुक्यात शहरी आणि ग्रामीण भागातील सर्व पदे सध्या भरलेली आ-हेत. तालुक्यासाठी उपविभाग कार्यालय आणि शाखा कार्यालय असे दोन विभाग आहेत. उपविभाग कार्यालयात उपकार्यकारी अधिकारी-१, कनिष्ठ अभियंता-१, उच्चस्तर लिपीक- रिक्त ( सध्या अतिरिक्त कारभार पाली उपविभाग), निमस्तर लिपिक- १, प्रधान तंत्रज्ञ-१, कंत्राटी कामगार-१ अशी एकुण सहा पद आहेत तर शाखा कार्यालयात सहाय्यक अभियंता -१, प्रधान तंत्रज्ञ-१, वरिष्ठ तंत्रज्ञ- ५, कंत्राटी कामगार- ८, असे पद आ-हेत. गेल्या वर्षी निसर्ग चक्री वादळात महावितरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, विद्युत पुरवठा पुर्ववत करण्यासाठी महावितरणाला चार महीने लागले काकडशेतच्या टोकापासुन ते कासेखोल पर्यंत आणि गिरणेच्या टोकापासुन ते मजगाव पर्यंत ग्राहकांना सेवा देण्यासाठी कर्मचारी वर्गाला तारेवरची कसरत करावी लागत आहे आणि म्हणुनच वादळानंतर सहा दिवस उलटून गेले तरी अनेक गावे आजही अंधारात आहेत. त्यामुळे तळा शाखेचे विभाजन होणे गरजेचे आहे.


उन वारा पावसाची तमा न बाळ-गता महावितरणाचे कर्मचारी दिवसरात्र राबतात तसेच अनेक ठिकाणी त्यांना जीव धोक्यात घालुन काम करावे लागते. त्यामुळे कर्मचारी ..../२

# तौक्ते चक्रीवादळाने उद्ध्वस्त झालेली महावितरणची गाडी रूळावर

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या तौक्ते चक्रीवादळाचा फटका उरणला मोठ्या प्रमाणात बसला यामध्ये सर्वाधिक नुकसान महावितरणचे झाले. मात्र महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर दुरूस्ती करून जवळ जवळ ९५ टक्के वीज सूरळीत केल्यांने लोकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

महावितरणचे संपूर्ण तालुक्यात ११ फिडरमध्ये बिघाड झाला होता पैकी १० फिडर मध्ये दुरूस्ती केली. तालुक्यातील एकूण ४०१ ट्रान्सफार्मरमध्ये बिघाड झाला होता पैकी ३९१ ट्रान्सफार्मची दुरूस्ती करण्यात आली आहे. उरण तालुक्यातील ५२ गावांचा वीज पुरवठा या चक्रीवादळामुळे खंडीत झाला होता पैकी ४९ गावांतील वीज सुरळीत सुरू करण्यात आली आहे. तालुक्यातील ३२ हाय टेन्शनचे तर २२ एलटी पोल(खांब) या वादळात पडले होते अनेक ठिकाणी तारा तुटल्या होत्या मात्र महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी रात्रभर युद्धपा-तळीने ही वीज दुरूस्तीची कामे केली. यावेळी महावितरणचे वरिष्ठ अधिकारी राजाराम माने, माणिक राठोड आणि सहाय्यक ..../२



# सूडनाट्याचा पुढचा अंक

ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकांमध्ये अभूतपूर्व यश मिळाल्यानंतर राज्यात शांतता नांदायला हवी होती; पण तसे झाले नाही. भाजप, काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या कार्यकर्त्यांवर राज्यात बेछूट हल्ले चढविण्यात आले. अनेक हत्या झाल्या. मुलांसमोर आई-वडिलांना छळण्यात आले. हे सगळे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी थांबविण्याची गरज होती. देशातील अनेक मोठे नेते स्तुतिसुमने उधळत असताना, ममतांच्या कार्यकर्त्यांचे हात मात्र रक्ताने माखत होते. आता 'नारद न्यूज पोर्टल'ने २०१४ मध्ये केलेल्या छुप्या चित्रिकरण प्रकरणातील चार जणांना केंद्रीय गुन्हे अन्वेषण खात्याने अटक केली आहे. त्यात दोघे नुकती शपथ घेतलेले, ममतांचे दोन सहकारी मंत्री आहेत. उरलेले दोन तृणमूल काँग्रेसचे नेते आहेत. त्यातला एक अलीकडेच भाजपमध्ये आला होता. 'तुम्ही आमच्या कार्यकर्त्यांना मारत असाल, तर आम्ही तुमच्या मंत्र्यांना कोठडीत डांबू शकतो,' असा इशारा या निमित्ताने केंद्र सरकारने ममता बॅनर्जी यांना दिला आहे. सीबीआयची ही कारवाई योग्य आहे का आणि या नारद प्रकरणात सध्या भाजपमध्ये असलेले मुकुल रॉय व शुभेंदू अधिकारी हे दोन नेते असताना, त्यांच्यावर कारवाई का होत नाही, असे प्रश्न स्वाभाविकच विचारले जातील. ते योग्यही आहेत; पण सीबीआयचे राजकियीकरण झालेच आहे. तेव्हा, याही नेत्यांना या नारद प्रकरणात अटक व्हायची असेल, तर न्यायालयाचे दरवाजे ठोठाविण्यावाचून दुसरा पर्याय नाही. बंगालमधील कोणी तसे करते का, हे लवकरच समजेल. ममता बॅनर्जी या स्वस्थ बसणाऱ्या नसल्याने, त्यांनी मंगळवारी राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांना खलिता धाडून, राज्यपाल जगदीप धनकड यांना परत बोलवा, अशी मागणी केली आहे. गेल्या काही दिवसांत धनकड यांनी हिंसाग्रस्त भागाचा दौरा केला. मृत कार्यकर्त्यांच्या नातलगांची भेट घेतली आणि ममतांना तर ते दिवसरात्र सूचना करीत आहेत. धनकड यांनी रंगविलेले हिंसाचाराचे चित्र अतिरंजित आहे, असे ममतांनी राष्ट्रपतींना कळविले आहे. असे असेल तर नेमके कोण व कुठे जखमी झाले, याची आकडेवारी ममतांनीच माध्यमांना सांगायला हवी. दुसरीकडे, बंगालमधील हिंसाचारात मरण पावलेल्या भाजपच्या दोन कार्यकर्त्यांच्या नातलगांनी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून, न्यायालयाने बंगाल सरकारला नोटीस बजावली आहे. पुढच्या आठवड्यात या नोटिशीचे उत्तर आल्यावर पुन्हा सुनावणी होऊ शकते. हे न्यायालयीन प्रकरण वाढू शकते आणि या हत्येच्या तक्रारी वाढूही शकतात. शपथ घेतल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी 'आता करोनाशी लढत' असे म्हटले होते. प्रत्यक्षात तसे झाले नाही. चार नेत्यांच्या अटकसत्रामुळे तर आता राजकीय तापमान कमी होण्याऐवजी वाढत जाईल. सीबीआयचा वापर करून राजकीय विरोधकांचे हात पिरगाळायचे, हे तंत्र पन्नास वर्षांपूर्वीच काँग्रेसने अंगिकारले. मोदी सरकारने ते तंत्र प्रगत अवस्थेत नेऊन ठेवले आहे. बंगालची मागची निवडणूक होण्याआधी २०१४ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या अनेक मंत्री, नेते, आमदारांनी एका काल्पनिक कंपनीला मदत करण्याचे वचन देऊन पैसे घेतले, असे चित्रण मॅथ्यू सॅम्युअल यांच्या नारद न्यूज पोर्टलने प्रकाशित केल्यावर, एकच खळबळ उडाली होती. पुढे २०१७ मध्ये हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले. तेव्हा, उच्च न्यायालयाने सीबीआय चौकशीचे आदेश दिले होते. त्या चौकशीत आता या अटका होत आहेत. राज्यातला मंत्री पदावर असताना पोलिस कोठडीत एक रात्र काढतो, असा प्रकार भारतात कदाचित प्रथमच घडला असणार. केंद्र सरकारने एकाचवेळी ममता आणि त्यांच्या मंत्र्यांना दिलेला हा इशारा आहे. सीबीआयकडे काही हे एकच प्रकरण नसणार. ठरविले तर अशा प्रकरणांची माळ लागू शकते; मात्र सारा देश करोनाग्रस्त असताना असे सूडनाट्य चालू ठेवायचे का, याचा विवेक केंद्र सरकारने दाखवायला हवा होता. एखाद्या मुख्यमंत्र्याने काम सोडून सहा तास सीबीआयच्या ऑफिसात जाऊन बसणे आणि दोन मंत्र्यांना अटकेपासून वाचविण्याचे प्रयत्न करणे, हे अभूतपूर्व चित्र आहे. यात, 'आमच्याकडे याल तर शरणागती देऊ आणि विरोधात असाल तर फास आवळू' हा जो इशारा दिला जात आहे, तो अत्यंत आक्षेपार्ह आणि राजकारणाची पातळी आणखी खालावणारा आहे. जे पश्चिम बंगालमध्ये घडते आहे, ते इतर राज्यांमध्ये आणि विशेषत: महाराष्ट्रातही घडू शकते, या यातला आणखी एक सुप्त इशारा आहे. एक माजी मंत्री सीबीआयच्या जाळ्यात आहे. एक सत्ताधारी आमदार बेपत्ता असल्याचे सांगितले जाते. इतरही काही मंत्र्यांच्या नावे हाकारे दिले जात आहेतच. फक्त मोदी सरकारने जरा न्यायबुद्धी व तारतम्य जागे ठेवावे. सीबीआयचा वापर करताना 'दुसऱ्याचेच पाहावे वाकून' असा पक्षपातीपणा करू नये. तसा होत असेल, तर तो रोखण्याची जबाबदारी न्यायसंस्थेची आहे. ती घ्यावी लागेल.

# कळंबोली पोलिसांनी विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांना लगाम घालताना आरटीपीसीआर टेस्टचे उगारले शस्त्र



**दै.रायगड नगरी । पनवेल**

काही लोकांना कोरोनाची लक्षणे असून सुद्धा कोरोना तपासणी न करता लक्षणे दिसताच घरीच उपचार करत आहेत त्याचप्रमाणे लॉकडाऊनमुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कळंबोली वसाहत व परिसरात कमी होत असल्याने नागरिकांच्या मनातील भीती कमी झालेली आहे. त्यामुळे नागरिकांचे विनाकारण इतरत्र वावरणे सुरू झालेले आहे.

कळंबोली पोलिस व पनवेल महानगर पालिका वैद्यकीय विभाग नियमित नागरिकांना सुचना देवून बाहेर न पडण्याचे नागरिकांना आव्हान करत असताना सुद्धा मॉर्निंग वॉक इव्हीनिंग वॉक करणार्याध इसम विनाकारण घराबाहेर फिरत आहेत असा ३८ नागरिकांची आरटीपीसीआर तपासणी करण्यात आली. मास्क न घालणे, विनाकारण फिरणारे नागरिकांवर दंडात्मक कारवाई सोबत टेस्ट करण्यात येणार आहे. व टेस्ट मध्ये कोविड पॉसिटीव्ह आढळल्यास थेट इंडिया बुल्स येथे रवानगी करण्यात येणार आहे.त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडत आहे. कोरोनाचे संक्रमण वाढण्याची शक्यता असल्याने पोलिस उपआयुक्त, परी-२, पनवेलचे शिवराज पाटील व सहा. पोलिस आयुक्त, पनवेल विभाग नितीन भोसले-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्रे क्र-४, नवीन पनवेल च्या वैद्यकीय अधिकारी अनिल पाटील यांच्याशी समन्वय साधून कळंबोली पोलिस ठाणे हद्दीत संयुक्त कारवाईमध्ये शिवसेना शाखा नाक्यावरून प्रवेश करणारे ठिकाणी नाकाबंदी करून विनाकारण फिरणार्यो ३७ लोकांची आरटिपिसिआर टेस्ट करण्यात आलेली आहे. सदर कारवाई मध्ये वैद्कीय पथकाचे पाच कर्मचारि व पोलीस दलाचे तीन अधिकारी व आठ कर्मचा -यांनी सहभाग घेतला होता. ही कारवाई चालू राहणार असून कोरोना पॉझिटीव येणाऱ्या ना इंडिया बुल या कोरोना सेंटरमुळे रवानगी करण्यात येईल असे वपोनि संजय पाटील यांनी सांगितले.

> कोरोनाची आरटीपीसीआर तपासणी केल्याने कोरोना पॉझिटीव रिपोर्ट बाहेर येत आहे. या भितीने मोकाट बाहेर फिरणा-यावर नियंत्रण येणार आहे मोकाट बाहेर फिरणारांवर यापुढे कारवाई केली जाईल पुढेही मास्क न घालणे, विनाकारण फिरणारे नागरिकांवर दंडात्मक कारवाई सोबत टेस्ट करण्यात येणार आहे. व टेस्ट मध्ये कोविड पॉझिटीव्ह आढळल्या त्यांची रवानगी ताबडतोब इंडिया बुल येथे करण्यात येईल ही मोहिम यापुढेही चालूच राहणार आहे तेव्हा विना कारण कोणीही घराबाहेर पडू नये व प्रशासनास नागरिकांनी सहकार्य करावे
>
> **संजय पाटील**
> **वरिष्ठ पोलिस निरीक्षक कळंबोली**

# चक्रीवादळाचा सामना करण्यासाठी डोंगरोली गावच्या तरुणांचा एनडीआरएफ पॅटर्न

## खेड्यातील धाडसी तरुणांचे आदर्शवत प्रातिनिधीक उदाहरण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील मौजे डोंगरोली येथील तरुणांची आदर्शवत कामगिरी केली. चक्रीवादळात मोठी हानी टाळण्यासाठी जागरुक राहुन या तरुणांनी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलासारख काम करीत, आपल्या स्वतःच्या गावची NDRF प्रमाणे एकत्रित टीम तयार करून रात्रभर सुरक्षितपणे गावात गस्ती घालून ताऊक्ते वादळाचा सामना केला व आलेलं मोठ विघ्न पार पाडल आहे. मागील वर्षीच्या निसर्ग वादळाने केलेली हानी व लोकांच्या मनातील भीती जाता जात नव्हती. अशातच आलेलं हे ताऊक्ते वादळ आणि त्याच रौद्ररूप हे निसर्ग वादळा पेक्षा भयानक असल्यामुळे लोकं अजून घाबरले होते. अश्या परिस्थिती लोकांना सुरक्षित ठेवण आणि धीर देण महत्वाच होत.





त्यामुळे या गावच्या तरुणांनी एकत्र येऊन हे करण्याचं ठरवलं. गावातील पक्की मजबुत घर शोधली व वादळ आल्यास लगेच लोकांना तिथे स्थलांतर करण्याची सोय केली. स्वतःच्या सुरक्षेला प्रथम प्राधान्य देऊन हेल्मेट व अन्य उपलब्ध सुरक्षा साधनांचा वापर करीत तरुणांनी दिनांक १५ ते १७ मे हे तीन दिवस सतत जागरुक राहून लोकांची काळजी घेतली. वादळ १६ तारखेला रात्री जास्त सक्रिय होणार असल्याची माहिती मिळताच गावातील काही लोकांना व्यायाम शाळा तसेच गावातील इतर नागरिकांची मध्यवर्ती असणारी मजबूत पक्की घरे अश्या ठिकाणी आधीच सुरक्षितपणे नेऊन ठेवले. यामुळे लोकांची रात्रीच्या वेळी होणारी धावपळ व मनातील भीती कमी झाली व सगळे सुरक्षित राहिले.


याआपत्ती मदतकार्यात गावातील नितीन पाखड, संजय डोंगरे, भरत डोंगरे, नारायण डोंगरे, महेश डोंगरे, अंकेश डोंगरे, सिद्धार्थ डोंगरे, बाळाराम डोंगरे, हरेश डोंगरे, चंद्रकांत डोंगरे, विकेश डोंगरे, अभिनंदन डोंगरे, निलेश ढउल, कल्पेश डोंगरे, परेश डोंगरे, प्रथमेश डोंगरे, विठ्ठल केंबळे, प्रमोद डोंगरे, अनिकेत डोंगरे तरुणांनी तसेच गावातील पंचकमिटी व पोलीस पाटील विनोद डोंगरे हे सुद्धा मोठ्या हिरहिरीने सहभागी झाले होते.

यापुढे अशा प्रकारे तरुणांची आदर्शवत कामगिरी जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील संपूर्ण गावागावात होणे आता काळाची गरज बनली आहे. यासाठी शासनाला खास सुरक्षा यंत्रणांना पाचारण करण्याची गरज पडणार नाही. अनेक सुशिक्षित धाडसी तरुण गावागावात आहेत त्याचे हे आदर्शवत प्रातिनिधीक उदाहरण आहे. फक्त शासनाने प्रशिक्षण व प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

# कर्नाळा येथील ६ वर्षीय मुलगा बेपत्ता

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील कर्नाळा येथील ६ वर्षाचा कु.निलेश महादेव शिगवण रा.कर्नाळा दि.१५ मे २१ रोजी दुपारी ११ ते १ वाजण्याच्या दरम्यान बोरघर हद्दीतील नावरी नावाच्या जंगला मधून मधल्या वाटेने आपल्या नातेवाईकांसोबत तळा ते कर्नाळा गावाकडे जात असतानाङ अचानक बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे.



तळा पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कु. निलेश महादेव हरवण्याच्या आधी त्याच्या सोबत त्याची आई व भाऊ होते.वाटेत आई नैसर्गिक विधी साठी बाजूला गेली असता ही दोन मुले तिथे होती त्यानंतर कु.निलेश दिसून न आल्यानेआई व दुसऱ्या मुलाने शोधाशोध केली. बराच वेळ शोधूनही न सापडल्याने गावात गेल्यावर ग्रामस्थांना सांगीतल्यावर गाव परिसरात नातेवाईक, व संपूर्ण नदी, विहीरी शोधून काढल्या असता न मिळाल्याने तळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस पथक आणि सामाजिक कार्यकर्ते निलेशचा शोध घेत आहेत

सदर मुलगा अचानक गायब झाल्याने भिती व्यक्त केली जात आहे. या मुलाचे वडील विकलांग असून आईचे मानसिक स्वास्थ्य बरे नसून या चुणचुणीत हुशार मुलासाठी ग्रामस्थ मंडळ अहोरात्र मेहनत घेऊन तपास करीत आहेत.यासाठी खाजगी ड्रोन कॅमेरा मागविण्यात आला असून युद्ध पातळीवर शोध सुरू आहे.सदर मुलगा आढळून आल्यास ०२१४०-२६९०३३ या फोन नं वर संपर्क साधावा असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे. तळा पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमा विरुद्ध भा.द.वि.कलम ३६३ प्रमाणे नोंद करण्यात आली असून पोलीस निरीक्षक सुरेश गेंगजे यांचे मार्गदर्शना खाली पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक शिवराज खराडे करीत आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## 'एलॲण्डटी'च्या अंडरपास खंदकात लालमातीचे ढिगारे कोसळू लागले!

दर्जाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रस्तुत प्रतिनिधीने सर्वप्रथम याबाबतचे वृत्त प्रसिध्द केल्यानंतर केवळ ४८ तासांतच पोलादपूर शहरातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळील अंडरपास रोडसाठी केलेल्या बॉक्स कटींगलगतची लालमाती कोसळू लागल्याने लालमातीचे ढिगारे कोसळण्याच्या शक्यतेचे वृत्त खरे ठरले आहे.

## सामाजिक संस्थांच्या सहकार्यामुळे कोरोनाविरोधी लढ्याला मोठी ताकद

रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर योग्य ती कारवाई करून ठेकेदारास रस्त्याचे डांबरीकरण व्यवस्थित करण्यास लावावे अशी मागणी त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे केली आहे. याबाबत आमदार रविशेठ पाटील यांनीही लक्ष द्यावे अशी विनंतीही करण्यात आली आहे.

यासंदर्भात किशोर म्हात्रे यांनी सांगितले की, या रस्त्याच्या बी.बी.एम. च्या कामाला काही दिवसांपूर्वी सुरवात होऊन बहुतांशी काम पूर्ण देखील झाले. परंतु काही दिवसातच या रस्त्यावर टाकलेले डांबर निघून जाऊ लागले आहे. येत्या काही दिवसातच नियमित पावसाळा सुरु होणार असून पावसाळ्यात रस्त्यावरील डांबर निघून जाऊन रस्त्याची अवस्था जैसे थे अशीच होणार असल्याचे आता चिन्ह दिसू लागली आहेत. घर बांधताना जोत्याचे काम मजबूत नसेल तर वीट बांधकाम टिकूच शकत नाही. आता रस्त्यावर बी. बी.एम. मारले आहे त्यावर आणखी दोन कोट येतील म्हणूनच बी. बी.एम चे काम महत्त्वाचे होते असेही किशोर म्हात्रे म्हणाले. रस्त्याच्या बी.बी.एम.ला मजबूतीकरण न दिल्यामुळे रस्त्यावरील डांबर निघायला लागले असून आता पहिल्याच पावसात रस्त्यावर खड्डे पडायला सुरवात होईल अशी भीतीही व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम खात्याचे व या रस्त्याशी संबधित कनिष्ठ अभियंता डी.एम.पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, पोयनाड ते आमडोशी फाटा या २९ किलोमीटर मार्गाच्या डांबरीकरण कामातीलच हा एक टप्पा असुन सध्या या रस्त्यावर केवळ बी.बी.एम चे काम करण्यात आले असून त्यानंतर अजून दोन कोट त्यावर येणार असल्याने तसेच या रस्त्याची देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी १० वर्षे संबधित ठेकेदारावरच असल्याने या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर ते चांगल्या दर्जाचेच होईल असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

## तौक्ते चक्रीवादळाने उद्ध्वस्त झालेली महावितरणची गाडी रूळावर

कार्यकारी अभियंता एच.व्ही. चोंढे आणि कर्मचाऱ्यांनी यासाठी अथक परिश्रम घेतले.

उरण तालुक्यातील जनतेला सुरळीत विद्युत पुरवठा करण्यासाठी बसविण्यात आलेल्या जून्या ट्रान्स फार्मरचे, लोखंडी पोल चे नूकसान झाले नाही.परंतु शासनाकडून सुमारे १०० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला, आणि सदर निधी ज्या कामासाठी खर्च करण्यात आला त्याच भागातील लोखंडी पोल चक्रीवादळात वाकल्याचे तसेच पडल्याचे भयानक चित्र पाहावयास मिळत आहे. त्यामूळे महावितरण कार्यालय उरणच्या वतीने खर्च करण्यात आलेल्या सुमाऱ्या १०० कोटींच्या निधीची सखोल चौकशी करण्यात यावी अशी ही मागणी आता जोर धरू लागली आहे.

## विज ग्राहकांना सुविधा देण्यासाठी महावितरण तळा शाखेचे विभाजन गरजेचे

तणावात असतात. तो तणाव दुर करण्यासाठी ठोस उपाय योजना म्हणुन शाखेचे विभाजन करणे गरजेचे आहे. तळा शाखा कार्यालयाचे विभाजन बाबतचा प्रस्ताव वरिष्ठा शाखा (बांद्रा) येथे २३/७/ २०१५ रोजी पाठविण्यात आला आहे. तालुक्यात महावितरणाचे विभाजन होऊन दुसरे सेक्शन आल्यास त्यास एक शाखा अभियंता आणि १२ वायरमन मीळतील आणि काम करण्यास सोपे जाईल महावितरणाच्यावतीने मांदाड येथे दुसरे सेक्शन व्हावे यासाठी प्रस्ताव तयार करून वरिष्ठांकडे पाठवण्यात आला आहे.

मागील चक्रीवादळात तळा तालुक्यात महावितरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले दोन ते तीन महीन्यांच्या कालावधी नंतर लाईट सुरळीत सुरु झाली मधल्या काळात पालकमंत्री अदितीताई तटकरे, खासदार सुनिल तटकरे आमदार अनिकेत यांनी महावितरण गैरसोई संदर्भात आढावा बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावले, त्यावेळी तळेवासीयांनी मांदाड येथे तालुक्याचे सब डिव्हीजन व्हावे अशी मागणी देखील केली होती पालकमंत्री अदितीताई तटकरे यांनी तळा तालुका महावितरणाचे विभाजन करुन विजेच्या संदर्भात सर्व सामान्य जनतेला योग्य सुविधा मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी होत आहे.

# कोरोना परिस्थितीत अनाथ झालेल्या बालकांचा शोध घेऊन पुनर्वसनासाठीचे प्रयत्न गतिमान करा : यशोमती ठाकूर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोना कालावधीत माता- पिता बळी पडल्यामुळे अनाथ झालेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठीचे प्रयत्न गतिमान करावेत, यासाठी अशा संकटग्रस्त बालकांपर्यंत पोहोचण्याची यंत्रणा प्रभावी करावी; घरगुती हिंसाचार आणि कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिलांना न्याय मिळवून देणे तसेच अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना कराव्यात; संकटग्रस्त महिला व बालकांना समुपदेशन उपलब्ध करून द्यावे, आदी निर्देश महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

राज्यातील सर्व महसुली विभागांची विभागनिहाय आढावा बैठक मंत्री ॲड. ठाकूर यांनी दुरदृश्य प्रणालीद्वारे घेतली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी मंत्रालयातून विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आय. ए. कुंदन, उपसचिव रवींद्र जरांडे आदी उपस्थित होते. तर संबंधित विभागाच्या बैठकीस विभागीय आयुक्त, त्या आयुक्तालय क्षेत्रातील जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

गतवर्षीपासून जगभरात सुरू असलेली कोरोनाची साथ ही असामान्य परिस्थिती असून यावर्षी ती अधिकच गंभीर झाल्याचे पाहायला मिळाले आहे, असे सांगून मंत्री ड. ठाकूर म्हणाल्या की, कोरोना कालावधीत कोरोना किंवा अन्य कारणाने माता- पिता असे दोन्ही पालक बळी पडल्यामुळे अनेक मुले अनाथ झाली आहेत. या मुलांचा शोध घेणे, त्यांना मदत पोहोचवणे व त्यांच्या पुनर्वसनासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा कृती बल (टास्क फोर्स) गठीत करण्यात



आले आहेत. काही अनाथ मुले नसल्याचे कागदोपत्री जरी दिसत असले तरी वस्तु-स्थिती वेगळी असणार आहे. त्यासाठी प्रयत्नपूर्वक अशा बालकांपर्यंत पोहोच-ावे लागेल. ग्रामविकास, महसूल विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांची यामध्ये महत्त्व-ाची भूमिका असून महिला व बालविकास विभागासोबत समन्वयाने काम केल्यास निराधार बालकांना आपण निश्चितच दिलासा देऊ शकू.

अनाथ मुलांच्या पुनर्वसनासाठी शासनाकडून काम होत असते याची माहिती काही लोकांपर्यंत नसते त्यामुळे आपल्यालाच अनाथ बालकांसाठीच्या जिल्हा कृती बलाची माहिती लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. माहितीचे योग्य व्यवस्थापन करून अनाथ बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी यंत्रणा गतिमान करा, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री ड. यशोमती ठाकूर यांनी दिले. संकटग्रस्त बालके, घरगुती हिंसाचाराला बळी पडलेल्या महिला, कामाच्या ठिकाणी लैंगिक शो-षणाला बळी पडलेल्या महिला किंवा कोविड परिस्थितीमुळे बाधित महिला व बालकांच्या पुनर्वसनासाठी त्यांचे समुपदेशन हे प्रभावी साधन आहे हे आपण गेल्यावर्षीच्या टाळेबंदी कालावधीत अनुभवले आहे. बाधित व्यक्तीला मानसिक धक्क्यातून बाहेर येण्यासाठी समुपदेशनाची मोठी मदत होते. त्यामुळे बधितांना दिलासा देण्यासाठी समुपदेशनाचा चांगला आणि भरपूर वापर करा, असेही ड. ठाकूर म्हणाल्या. ज्या ठिकाणी बाल कल्याण समित्या (सीडब्ल्यूसी) कार्यरत नसतील तर त्या जिल्ह्यांसाठी लगतच्या कोणत्या सीडब्ल्यूसी संलग्न आहेत त्या ठिकाणी संकटग्रस्त मुलांना मदत मिळवून द्यावी. निराधार बालकांचे शासनाकडून संगोपन आणि पुनर्वसन करण्यात येईल. परंतु, अनाथ झालेल्या बालकांचा सांभाळ करण्यास त्यांचे नातेवाईक तयार असल्यास ही प्रक्रिया पूर्ण करावी तसेच त्या बालकांचे योग्य संगोपन होत असल्याची खात्री करण्यासाठी भविष्यात वेळोवेळी माहिती घ्यावी. शक्य असल्यास बालसंगोपन योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करावा. निराधार बालकांना स्वीकारणारे कोणी नसल्यास त्यांना बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्थांमध्ये दाखल करावे. तसेच अशा बालकांची कायदेशीर दत्तकविधान प्रक्रिया होण्याच्यादृष्टीने प्रयत्न करावेत. फोस्टर केअर योजनेचा पर्यायही तपासून पहावा. अर्थात या बाबींसाठी आधी निर-ाधार बालकांचा शोध घेणे गरजेचे आहे. महिलांवरील घरगुती हिंसाचाराची प्रकरणे काळजीपूर्वक आणि संवेदनशीलरित्या हाताळावीत. त्यासाठी अशा महिलांना समुपदेशन उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच त्या महिलांच्या कुटुंबियांचेही समुपदेशन करून त्यांना हिंसाचार करण्यापासून परावृत्त करावे. आवश्यक असेल तेथे महिलांना कायदेशीर मदत मिळवून द्यावी.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...


## भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियान २०२१ चे यशस्वी आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तरुणाईच्या कलागुणांनासाठी हक्काचे व्यासपीठ असणारे भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियान २०२१ या ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्वरांनी आणि वादनाने रसिक स्त्रोत्यांना मंत्रमुग्ध केले . गायन स्पर्धेत रिध्दी समवादे हिने प्रथम क्रमांक पटकावला तर द्वितीय क्रमांक उमंग निगम याने पटकावला आहे. वादन स्पर्धेत सिद्धार्थ गरुड याने प्रथम क्रमांक पटकावला आहे तर द्वितीय क्रमांक ओजस जोशी याने प्राप्त केला. तरुणाईच्या कलागुणांना वाव देत नेत्रदीपक अशी नृत्य स्पर्धा पार पडली. कोरोनाच्या पार्श्वगभूमीवर सर्व नियमांचे पालन करीत ही स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने पार पडली. वैयक्तिक नृत्यमध्ये प्रथम क्रमांक मेधा तेंडूलकर तर द्वितीय क्रमांक पियूष डांगळे याने प्राप्त केला आहे. गट नृत्य स्पर्धेत के. जे. सोमय्या अभियांत्रिकी महाविद्यालय याने पटकावला आहे.

अभियान अंतर्गत नेत्रदीपक असे फॅशन शो चे आयोजन केले होते . भारती विद्यापीठ चा व्हर्च्यूअल फॅशन शो यूट्यूब चॅनेलवर झाला. विद्यार्थ्यांनी शैली, साहित्य आणि संकल्पनांचे एकत्रित मिलाप करीत त्यांचे कौशल्य प्रदर्शित केले. या फॅशन शो मध्ये ' ऑफ रॅक पॅक' या गटाने प्रथम क्रमांक पटकावला. ची. अभियान हे पारितोषिक मकरंद थोराट याला मिळाले तर ची. अभियान हे पारितोषिक स्मृती भट हिला मिळाले आहे. फॅशन शो मध्ये राज सिं व्यक्तिगत मुलांमध्ये आणि व्यक्तिगत मुलींमध्ये मानसी चव्हाण हिने पारितोषिक पटकावले आहे. ' पुन्हा शाळेत जावे' या थिम वर आधारित अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांचे नियोजन केले होते आणि ते यशविरीत्या पार पडले.



# समजून घेऊ म्यूकोर्मिकोसिस (ब्लॅक फंगस)

कोविड–१९ या आजाराशी लढता लढता आणखी एका आजाराने काही रुग्णांना ग्रासले आहे, या आजाराविषयी जाणून घेऊ या लेखाद्वारे.....

करोनानंतर रुग्णांमधे जीवघेण्या बुरशीचा संसर्ग (ब्लॅक फंगस) वाढत असल्याचे दिसून येत आहे. राज्यात तसेच देशात करोनाचा धोका असतानाच करोनामुक्त झालेल्या रुग्णांमधे म्युकोर्मिकोसिस हा गंभीर संसर्ग बळावतो आहे.

**म्यूकोर्मिकोसिस म्हणजे काय?**

म्यूकोर्मिकोसिस हा एक प्रकारचा बुरशीजन्य संसर्ग आहे. हा तुलनेने दुर्मिळ आहे, परंतु अत्यंत गंभीर देखील आहे. साधारणत: झिगॉमायकोसिस म्हणून या आजारास ओळखले जाते. एखाद्या आजारपणामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी झाली असेल तर हे संक्रमण बहुतेक वेळा उद्भवते. याकरिता उपचार घेणे महत्वाचे आहे. उपचार न घेतल्यास म्यूकोर्मिकोसिस प्राणघातकही ठरू शकतो.

**कोणाला जास्त धोका?–**

कुठल्याही कारणाने रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या रुग्णांमधे हा संसर्ग जास्त प्रमाणात होतो. दुसऱ्या लाटेनंतर प्रमुख्याने करोना पश्चात रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्याने (कोविड–१९ च्या उपचारातील रेमडेसिवर, स्टेरॉईड व अँटीबायोटिक्सच्या वापराच्या दुष्परिणामामुळे) तसेच उच्च रक्तदाब, अनियंत्रित मधुमेह, अवयव प्रत्यारोपण केलेल्या व्यक्तींमध्ये याचे गंभीर स्वरुप पहावयास मिळते.

**म्यूकोर्मिकोसिसची लक्षणे कोणती आहेत?**

या आजारात व्यक्तीच्या श्वसनयंत्रणेस किंवा त्वचेस संसर्ग उद्भवतो. यात प्रामुख्याने पुढील लक्षणे आढळतात:–खोकला, ताप येणे, डोकेदुखी, नाक बंद, सायनस वेदना, दातांमधे तीव्र वेदना, दात हलणे, हिरड्यांमधून पू येणे, तोंडातून दुर्गंधी येणे, टाळूवर एखादा काळा चटटा येणे, नाकातून पू येणे, दृष्टी कमी होणे, डोळे लाल होणे, डोळ्यांची हालचाल कमी होणे, चेहऱ्यावर सूज येणे वा बधीरता येणे, जबड्याचे हाड उघडे पडणे, त्वचा काळसर होणे, त्वचेवर मेदयुक्त फोड येणे, त्वचेवर लालसरपणा येणे, शरीराला सूज येणे, मलूलपणा जाणवणे, अल्सर या आजारामुळे प्रसंगी वरचा डोळा व जबडा गमवायची वेळ येऊ शकते. तसेच मेंदूपर्यंत संसर्ग पोहोचल्यास प्रसंगी मृत्यूही संभावतो.

**म्यूकोर्मिकोसिस कशामुळे होतो?**

म्यूकोर्मिकोसिस हा आजार म्यूकोर्मिटाईड मोल्ड्सच्या संपर्कातून उद्भवतो. हे जीव... पाने, कंपोस्टचे ढीग, माती सडणारे लाकूड, यात आढळतात. हे प्रभावित मोल्ड श्वसन यंत्रणेस संसर्गित करते व त्यातून म्यूकोर्मिकोसिस आजार उद्भवतो. याला फुफ्फुसीय संसर्ग (synus infection) म्हणून संबोधले जाते.

हे संक्रमण पुढील माध्यमातून अधिक संक्रमित होते:– केंद्रीय मज्जासंस्था (हे माध्यम दुर्मिळ आहे), डोळे, चेहरा, फुफ्फुसे, सायनस, त्वचेवरील जखम किंवा भाजलेली जखम (त्वचेच्या संसर्गातून) मात्र प्रत्येकाला बुरशीजन्य संसर्ग होतोच असे नाही. एखाद्या व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झाल्यास त्यास या प्रकारचा संसर्ग होण्याचा धोका वाढू शकतो.

ज्या परिस्थितींमध्ये आपला संसर्गाचा धोका वाढू शकतो त्या पुढीलप्रमाणे आहेत:– भाजलेली जखम, कापलेली जखम आणि खरचटलेली जखम, कर्करोग, अलिकडील अवयव प्रत्यारोपण, मधुमेह (विशेषत: जर योग्यरित्या उपचार केला जात नसेल तर), शस्त्रक्रिया, एचआयव्ही किंवा एड्स, त्वचेच्या संसर्गासह, आपल्या शरीराच्या कोणत्याही भागात म्यूकोर्मिकोसिस विकसित होऊ शकतो. हा सुरुवातीला त्वचेच्या माध्यमातून उद्भवू शकतो. परंतु पुढे दुर्लक्ष झाल्यास गतीने दुसर्या भागातही हा संसर्ग पसरण्याचा धोका असतो.

उपाय:– वेळीच निदान आणि उपचार केल्यामुळे या आजारामुळे होणारे संभाव्य दुष्परिणाम टाळता येतात. यासाठी.... रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवणे आवश्यक, करोनाच्या उपचारादरम्यान स्टेरॉईडचा आवश्यक तेवढाच वापर गरजेचा असून अतिरिक्त वापर टाळणे अत्यावश्यक.,

प्रतिजैविकांचा (Antibiotics)तारतम्याने वापर आवश्यक ऑक्सीजन सिलिंडरच्या ह्यूमिडिफायरमधे distilled water चा वापर.

उपचार(Treatment):– अँटी फंगल ट्रीटमेंटची गरज असेल तर सर्जरी करुन बाधित झालेला भाग काढून टाकला जातो. यासाठी दंतशल्यचिकित्सक, ओरल आणि मॅकझिलोफ़ेशियल सर्जन, कान–नाक–घसा तज्ञ, न्यूरोसर्जन व फिजिशियन यांच्या सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.

**म्यूकोर्मिकोसिस संसर्ग रोखणे शक्य आहे काय?**

म्यूकोर्मिकोसिस संक्रमित होणारा आजार नाही. म्हणून संक्रमित व्यक्तीकडून तो आजार दुसऱ्या व्यक्तीला होवू शकत नाही. मात्र या प्रकारच्या संसर्गापासून बचाव करण्याचा उत्तम उपाय म्हणजे स्वतःची काळजी घेणे, वैयक्तिक स्वच्छतेकडे काळजीपूर्वक लक्ष देणे.

आपली प्रतिकारशक्ती दुर्बल असल्यास, घराबाहेर स्वत:ला सुरक्षित ठेवणे महत्वाचे आहे. कोणत्याही ठिकाणी काम करताना मुखवटा (मास्क) घातल्यास आणि पूर्ण बरे होईपर्यंत सर्व जखमांवर नियमित मलमपट्टी करीत राहिल्यास बुरशीजन्य संसर्ग रोखणे शक्य होईल. उन्हाळ्यात आणि शरद ऋतूतील महिन्यांमध्ये अतिरिक्त सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे, कारण या वातावरणात बुरशीचे प्रमाण वाढण्याची शक्यता जास्त असते. म्यूकोर्मिकोसिस या आजाराबाबतची ही माहिती आपल्या सर्वांना उपयुक्त ठरेल यात शंका नाही. तरी सर्वांनी काळजी घ्यावी. वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष द्यावे. कोणत्याही लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. आणि काही लक्षणे आढळल्यास डॉक्टरांचा त्वरित सल्ला घ्यावा.

**मुख्य मार्गदर्शन**
**डॉ.स्वाती गणेश वारे, पनवेल**
**लेखन व संपादन**
**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**रायगड–अलिबाग**

## सुधागड तालुक्यात १८ कोरोना बाधित रुग्ण झाले बरे, दोघांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात बुधवारी (ता.१९) १८ कोरोना बाधित रुग्ण बरे झाले आहेत. तर ४ कोरोना बाधित रुग्ण सापडले असून दोघांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. सध्या तालुक्यात कोरोनाचे १०९ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे १०३९ रुग्ण झाले असून ८८३ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ४७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.

## माजी उपनगराध्यक्ष आरीफ पटेल यांना बंधूशोक ; खलिल अहमद शफीक अहमद पटेल यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आरिफ पटेल यांचे कनिष्ठ बंधू खलिल अहमद शफीक अहमद पटेल यांचे नैसर्गिक निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६१ वर्षे होते. सुरू असलेल्या पवित्र रमजान महिन्यात शांतपणे मृत्यूचे आमंत्रण येणे म्हणजे जन्नत नशीब होणे असे इस्लाम धर्मात मानले जाते. इस्लाम धर्माच्या शिकवणी नुसार मक्का मदिना येथे मृत्यू येणे, अल्लाह च्या राह मध्ये मृत्यू येणे आणि रमजान महिन्यात मृत्यू नशिबी येणे यास सौभाग्य समजले जाते. खलील अहमद पटेल यांच्या पश्चात पत्नी, विवाहित मुलगा, विवाहित मुलगी, सून, जावई, नातवंडे,भाऊ,भावजय असा मोठा परिवार आहे.

खलिल भाई यांनी दोन दशकाहून अधिक कालखंड सौदी येथे नोकरी निमित्ताने वास्तव्य केले. सौदी मध्ये असताना व तेथून परतल्यानंतर खलील भाई यांनी नेहमीच सामाजिक कार्यासाठी सढळ हस्ते योगदान दिले. मायनॉरिटी गर्ल्स स्कूल च्या उभारणी करता निधी संकलना मध्ये त्यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. परंतु दान हे सत्पात्री व गुप्त असावे या सिद्धांतानुसार त्यांनी कधीही केलेल्या समाजकार्याचा अथवा सढळ हस्ते दिलेल्या मदतीचा गवगवा केला नाही. अर्थातच या सगळ्यामुळे ते प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहिले.

४ मे च्या रात्री त्यांनी ईशा आणि तरावी ची नमाज अदा केली, त्यानंतर वितर ची नमाज अदा करून ते निजावयास गेले.पहाटे लवकर उठून त्यांनी तहज्जुद ची नमाज अदा केली,त्यानंतर फझर ची नमाज अदा करून ते मॉर्निंग वॉक साठी गेले. तेथून परतल्यानंतर त्यांनी कुटुंबियांस सांगितले की आता मी कुरान पठणासाठी बसत आहे त्यानंतर मी विश्राम करणार आहे. साधारण साडेनऊ ते पावणे दहाच्या दरम्यान त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला असता त्यांची प्राणज्योत मालवली असल्याचे लक्षात आले. त्यांना नैसर्गिक मृत्यू आला. खलिल अहमद शफीक अहमद पटेल हे माजी उपनगराध्यक्ष आरिफ भाई पटेल यांचे कनिष्ठ बंधू होते. निधनाची वार्ता समजल्यानंतर आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस नगरसेवक गणेश कडू यांच्या सह असंख्य लोकांनी आरिफ पटेल यांचे सांत्वन केले.

अल्लाह ताला मरहुम की मगफिरत फरमाये, जन्नतुल फिरदोस मे आला मुकाम अता फरमाये और अहले खाना को सबरे जमील अता फरमाये, आमिन,ही प्रार्थना
**- अब्दुल हमीद धुरू**

## ऑलिम्पिक तयारीसाठी मुलांना लहानपणीच प्रोत्साहन देण्याची गरज : अरविंद रमेश प्रभू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

श्री पार्लेश्वर व्यायाम शाळा यूट्यूब चॅनलवर मल्लखांब कट्टामध्ये आपण वेगवेगळे क्रीडा विषय घेऊन येतो. त्याच प्रमाणे ह्या रविवारी इंटरॅक्शनल विथ स्पोर्ट्स सेंटर प्रेसिडेंट हा विषय घेऊन लोकांसमोर मांडतांना अरविंद प्रभू आपले विचार मांडताना म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती जो आम्ही प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल म्हणून चालवतो तो क्लब नाही तर ते क्रीडा संकुल आहे. आमच्याकडे रेस्टॉरंट, बार, कार्ड झोन नाही फक्त खेळ सुखसुविधा असल्याचे अंधेरी मल्लखांब संघाचे अध्यक्ष अरविंद प्रभू यांनी स्पष्ट केले.



१९९६ मध्ये माझे वडील डॉ. रमेश यशवंत प्रभू ( मा.महापौर, मा. आमदार) यांनी ही संकल्पना केली. तेव्हा दादर पासून बोरीवली पर्यंत कोणताच ऑलम्पिक आकाराचा जलतरण तलाव नव्हता म्हणून त्यांनी ठरवले कि विलेपार्ले नगरीत जर ऑलम्पिक पातळीचा जलतरण तलाव झाला तर लाखो लोकांना त्याचा वापर करता येईल. गेल्या वीस–बावीस वर्षांत हजारोंच्या पट्टीत लोकांना पोहण्याचे प्रशिक्षण दिले आहे आणि बर्याच प्रमाणात मुले आज राज्य – राष्ट्रीय पातळीवर खेळत आहेत याचा आम्हाला खूप आनंद आहे. अरविंद प्रभू सांगतात माझ्या वडिलांचा जो विचार होता की हेल्दी लाइफस्टाइल हे आम्ही या संकुलाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवत असल्याचे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती (रजि.) प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद प्रभू यांनी म्हटले.

आज संकुलात चार वर्षांच्या मुलांपासून ते सत्तर ऐंशी वर्षाच्या तरुणांपर्यंत सर्व वयोगटातील लोक खेळण्यासाठी येतात. ऑलम्पिक मध्ये एक तरी खेळाडू आमच्या संकुलातील असेल व आपल्या भारत देशाचे नाव मोठे करेल हा आमचा उद्देश आहे आणि आम्ही त्याच्यासाठी प्रयत्न करतो आहोत. कॅच देम यंग म्हणजे लहान वयातील जास्तीत जास्त मुलांना खेळ खेळण्यास प्रोत्साहित करण्याचा आमचा हेतू असतो. इथे आल्यावर कोणीही मुले उगीच मोबाईलवर नसतात. आमच्या येथील मुलांपासून पालक सर्वजण शिस्तबद्ध आहेत. त्यांना वेगळी शिस्त लावावी लागत नाही असे आमच्या संकुलाचे वातावरण आहे. येथे मुलांना लहानपणापासूनच एक आदर्श नागरिक बनवण्यास आम्ही शिकवतो. आमच्या संकुलात वेगवेगळ्या खेळा प्रमाणेच मुले आपल्या शिक्षकाला आदराने नमस्ते करतात, साधनाला वंदन करतात नंतर प्रशिक्षणाला सुरुवात करतात.अरविंद प्रभू सांगतात की मल्लखांब हा असा खेळ आहे की ज्यामुळे मज्जा संस्था, लवचिकता व स्नायूंची बळकटी वाढते त्यामुळे मुलांनी लहानपणापासूनच मल्लखांबाची सुरुवात केली पाहिजे. मल्लखांबामुळे एकाग्रता आणि स्नायुंमधिल ताकद वाढते त्याचा फायदा आपल्याला दुसरे खेळ खेळण्यास होतो. मल्लखांब हा बिगिनिंग ऑफ ऑल कॉम्पिटिटिव्ह स्पोर्ट्स आहे. मल्लखांबातील शिस्त देखील खूप छान आहे. मल्लखांबाला एक चांगला दर्जा दिला गेला पाहिजे म्हणुन माझ्या आईने म्हणजे डॉ. पुष्पा रमेश प्रभू नी मल्लखांबाच्या निमंत्रित महापौर व वडिलांच्या नावाने सुरू केलेल्या ठधझ स्पर्धा भरवल्या. स्पर्धेचा दर्जा खूपच चांगला असला पाहिजे असा आईचा हट्टच होता. जेवढ्या चांगल्या दर्जाचा आपण खेळ बघतो तेव्हा तो तसा खेळण्यासाठी आपण प्रोत्साहित होतो. आम्ही नवीन मुलांना प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न करतो. आजही संकुलात आम्ही कमीत कमी पैशात जास्तीत जास्त सुख सुविधा देण्याचा प्रयत्न करतो. आम्हाला या संकुलात क्रिडा वाचनालय सुरु करायची इच्छा आहे. सध्या आम्ही एक वर्ग बनवलाय त्यात इंटरनेट सुविधा आहे, कम्प्युटर आहे ज्याला पाहिजे तेथे जाऊन तो खेळाबद्दल पाहिजे ती माहिती मिळवू शकतो असेही अरविंद प्रभू यांनी सांगितले.

या सत्राचे सूत्रसंचालन मल्लखांब संघ अंधेरीचे सचिव व श्री पार्लेश्वर व्यायाम शाळेचे प्रशिक्षक श्री गणेश देवरुखकर यांनी केले. तसेच महेश अटाळे सरांनी या चर्चासत्रासाठी पुढाकार घेतला.

## तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची प्राथमिक माहिती जिल्हा प्रशासनाने केली जाहीर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तौक्ते चक्रीवादळाचा प्रभाव रायगड जिल्ह्यातील आणि तालुक्यांवर पडला असून जिल्ह्यातील नुकसानीचा प्राथमिक अंदाज जिल्हा प्रशासनाने जाहीर केला आहे. या नुकसानीत अंदाजे किती रुपयांचे नुकसान झाले आहे, याबाबत माहिती घेण्याची कार्यवाही अद्याप सुरू आहे.

आतापर्यंत जिल्ह्यात एकूण ४३.१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून अलिबाग, श्रीवर्धन, म्हसळा आणि पोलादपूर या तालुक्यांना चक्रीवादळाचा सर्वात जास्त फटका बसला आहे. जिल्ह्यातील ६ हजार २६ घरांचे अंशत: नुकसान तर १० घरांचे पूर्ण नुकसान झाले आहे. एकूण ४ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, ७ व्यक्ती जखमी झाल्या आहेत. कोणतीही व्यक्ती हरविल्याची नोंद नाही. त्याचबरोबर २ प्राण्यांचाही मृत्यू झाला आहे.

महावितरणच्या एकूण १६८ HT पोलचे, ४२६ LT पोलचे तर १२ ट्रान्सफॉर्मरचे नुकसान झाले आहे. यामुळे जिल्ह्यातील ६६१ गावातील (लोकसंख्या अंदाजे १ लक्ष ६ हजार) वीजपुरवठा खंडित झाला आहे. वीजपुरवठा पूर्ववत सुरू करण्यासाठी महावितरणचे अधिकारी–कर्मचारी युद्धपातळीवर प्रयत्न करीत आहेत. चक्रीवादळामुळे विविध ठिकाणी झाडे/ झाडाच्या फांद्या पडल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे बंद झालेले रस्ते मोकळे करण्याची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ केल्यामुळे सद्य:स्थितीत कोणतेही रस्ते बंद नाहीत.

जिल्ह्यातील मच्छीमारांच्या १२५ जाळ्यांचे व १५० बोटींचे अंशतः नुकसान झाले आहे. जिल्ह्यात अंदाजे ५ हजार हेक्टर.आर शेतजमिनीचे नुकसान झाले असून यामध्ये प्रामुख्याने आंबा, नारळ, भातशेती यांचा समावेश आहे. मात्र निसर्ग चक्रीवादळाप्रमाणे यावेळी झाडांचे नुकसान न होता फक्त फळांचे नुकसान झाले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.संतोष कृष्णाजी घरत व श्री.संजय नारायण ठाकूर यांच्या मालकी हक्कातील, ताबेकब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णनाची जमीन आमचे अशिलांनी, त्यांचेकडून, कायम खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे : घेरासुधागड, तालुका : सुधागड, जि.रायगड**

| भूमापन नं. | उपविभाग नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४५ | २/अ/१ | ८–९१–९० | 0.00 |

येणेप्रमाणे, वर्णनाच्या जमिनीमध्ये, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, मालकी हक्क, हक्क हितसंबंध, कुळवहिवाट, ताबाकब्जा, गहाण, दान, बक्षिसपत्र, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, सात (०७) दिवसाच्या आत त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत, खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी अगर प्रत्यक्ष भेटून कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल, सदर जमिनीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.
पनवेल
दि.२०/०५/२०२१

**सही/–**
**ॲड.सुरज हरिश्चंद्र म्हात्रे**
**१०४, पहिला मजला, पवन को.ऑप.हौ. सोसायटी, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे समोर, लोखंडीपाडा, पनवेल–४१०२०६**
**दूरध्वनी क्र.९१६७६९७०२१**



**ग्रामपंचायत कोळखे**
ता.पनवेल, जि.रायगड
**जाहीर निविदा**

दि.१९/०५/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील ग्रामनिधी योजनेंतर्गत खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.२०/०५/२०२१ ते २७/०५/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२८/०५/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पारपुंड गावातील अंतर्गत गटार साफ करणे व दुरुस्ती करणे | १०२६६२/– | १०२६/– | १ महिना |

**अटी व शर्ती :–**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/–**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**

# संक्षिप्त...

## तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून बाहेरून कडी लावून तसेच स्वतः चे सर्व सामान घेवून एक तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

खारघर वसाहतीमधील सेक्टर १२ या ठिकाणी राहणारी १९ वर्षीय तरुणी रंग गोरा, नाक बसके, चे-हरा उभट, बांधा सडपातळ, उंची ५ फूट २ इंच असून अंगात ग्रे रंगाचा टॉप व शॉर्ट लेगिज सोबत एक सोन्याचे मंगळसूत्र व एक चेन व मोबाईल घेवून गेली आहे. तीला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा अवगत आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे पो.हवा.सचिन गोसावी यांच्याशी संपर्क साधावा.

## मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलजवळील कसळखंड येथील नवकार कंपनी गेटसमोर उभी करून ठेवलेली हिरो कंपनीची काळ्या रंगाची स्प्लेंडर मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

नंदलाल तायडे (२८) यांनी त्यांची २५ हजार रुपये किंमतीची एमएच-२७-सीके-६१५० ही सदर ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटार सायकल चोरुन नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## भातावर बीज प्रक्रिया करुन पेरणी करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**दै.रायगड नगरी । उरण**


कृषी विभागामार्फत खरीप हंगामामध्ये सुरवातीस बीज प्रक्रिया मोहीम उरण तालुक्यातील चाणजे सजा मार्फत राबविण्यात येत आहे. बीज प्रक्रिया व भात उगवण क्षमता चाचणी तसेच दहा टक्के रासायनिक खत बचत याविषयी प्रात्यक्षिक घेण्यात आले. त्यामध्ये कृषी पर्यवेक्षक ढवळ व्ही. एस. व कृषी सहाय्यक एस.एस.ढ़ाकणे यांनी शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक करुन दाखवुन मार्गदर्शन केले. बीज प्रक्रिया केल्या मुळे जमिनितून बियाणे द्वारे पसरणा रे रोग व किडीचा प्रादुर्भाव कमी करुन पिकांची वाढ होण्या साठी बीज प्रक्रिया कमी खर्चाचे अत्यंत प्रभावी साधन आहे. तसेच बियाणे उगवण असताना चाचणी ही शेतकर्यानी पेरणी आधी करावी असे आवाहन केले. तसेच कृषी विषयक इतर योजना महाराष्ट्र रोजगार हमी योजने अंतर्गत आंबा नारळ फळबागलागवड़ीचा चाणजे सजेतील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन कृषी सहाय्यक एस.एस.ढ़ाकणे यानी केले आहे.



# पहिला दुसरा डोसच्या खेळाने लसिकरणाची चेष्टा ; आरोग्य यंत्रणेची उदासिनता

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

कोव्हिशिल्ड पहिला डोस व कोव्हॅक्सिन दुसरा डोस ४५ वरील वयोगटासाठी सुरु आहे. कोव्हिशिल्ड चा दुसरा डोस मात्र यापुढे नविन आदेशानुसार ८४ दिवसांनी देणार आहेत. म्हणजे आता ज्या लोकांची कोव्हिशिल्डच्या दुसरा डोसची तारीख आली असेल त्यांनी आणखी ४२ दिवसा नंतरच्या तारखेला डोस घेण्यास जावे नाहीतर फेरी फुकट जाईल. कारण ऑनलाईन नोंदणीची तारीख ४२ दिवसांनी वाढविलेली दाखवत असल्याने डोस मिळणार नाही. याची नागरिकांनी नोंद घ्यावी अशी लसिकरणाची दररोज नविन परिस्थिती आहे. पहिल्या दुसरा डोसच्या खेळाने लसिकरणाची चेष्टा होत असुन आरोग्य यंत्रणेची उदासिनता व नागरिकांची हतबलता ऐरणीवर आली आहे.




कोव्हिशील्ड चे लसिकरण सुरु झाले त्यावेळी पहिला डोस घेतल्या नंतर २८ दिवसांनी दुसरा डोस घ्यायलाच पाहिजे. असे तज्ञ डॉक्टर व संबंधित शासन आरोग्य यंत्रणा सांगत होते. सुरुवातीला लसिकरणासाठी लोकांमध्ये जनजागृती करुनही लोक लसिकरणासाठी येत नव्हते आता मात्र लसिकरणासाठी झुंबड उडत आहे. त्यानंतर कोव्हिशिल्ड ४२ दिवसांनी घेतली तरी चालते, अस म्हणत लसिकरण ४२ दिवसांनी सुरु झाले. आता नविन आदेशा नुसार ८४ दिवसांनी लस घेतली तरी चालेल; नव्हे तसे लसिकरण केंद्रावर सांगताहेत देखिल. लोक मात्र जुण्या माहिती नुसार लसिकरणा साठी येत असुन लस मिळत नाही, विनाकारण फेरफटका भुर्दंड पडत आहे.

या उलट परिस्थिती कोव्हॅक्सिन लसी बाबत असुन अजुन तरी २८ दिवसांनीच दुसरा डोस घ्यावा असे सांगत आहेत. मात्र कधी बदलेल हा नियम हे सांगता येत नाही. अशा परिस्थितीत कोव्हॅक्सिन पहिला डोस १८ ते ४४ वयोगटासाठी सुरु केला गेला आणि लगेचच तो पुढील आदेश होईपर्यंत बंद करण्यात आला. अशी सगळी लसिकरणाची गंमत जंमत सुरु आहे.

राज्य आणि केंद्र शासनाच्या आरोग्य यंत्रणेत अजुनही एक वाक्यता नसल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत असुन लोक याबाबत नाराजी व्यक्त करीत अत्यंत संभ्रमावस्थेत आले आहेत. लसिकरणावरील विश्वास उडत असुन लोक लसिकरण नाही केले तरी काही फरक पडत नाही ! अशीच भावना आता व्यक्त करत आहेत.

कोरोना सारखी वैश्विक महामारी संकट हा गंभीर विषय असुनही लसिकरण हा आता चेष्टेचा विषय झाला आहे. अस लोक बोलुन दाखवत आहेत. शासनाचे लसिकरणा बाबतच्या धरसोड वृत्तीमुळे त्यातील गांभिर्य उरले नाही. राज्यात देशात लसिचा तुटवडा व सुरु असलेले राजकारण या विषयी जनतेमध्ये नाराजी व गोंधळाची स्थिती पाहवयास मिळत आहे.

# चक्री वादळा पाठोपाठ अवकाळी पावसाचा उन्हाळी भातशेतीला तडाखा ; सलग तीन वर्षे होत आहे नुकसान



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

दोनच दिवसांपूर्वी होऊन गेलेल्या चक्रीवादळाने व लागोपाठ कोसळलेल्या अवकळी पावसामुळे उन्हाळी भातशेतीला चांगलाच तडाखा बसला असून तयार भातशेती जमिनदोस्त झाली आहेच याशिवाय कापलेल्या भाताची करपेही पाण्यावर तरंगल्याने शेतकरीवर्ग हवालदिल झाला आहे.

डोलवहाल बंधा-याच्या पाण्यावर आधारित काढलेल्या कालव्याद्वारे रोहे तालुक्यात उन्हाळी हंगामात भातशेतीचे पिक काढले जात आहे. उन्ह-ाळी भातशेतीमुळे शेतकरी वर्गाला चांगला दिलासा मिळून ब-यापैकी आर्थिक सुबत्ताही आली आहे. त्यामुळे उन्हाळी हंगामातील भातशेती पिकविणे शेतकरी वर्गाच्या दृष्टीने फायदेशीर ठरू लागली आहे.

कालव्याच्या पाण्यावर आधारित भातशेती पिकविणे फायदेशीर ठरू लागल्याने शेतकरी वर्गाचा कलही उन्हाळी भातशेती पिकविण्यावर दिसून येत आहे. परंतू शेती व शेतकरी वर्गावर अधून मधून येणाऱ्या संकटांचा विचार करता काहीवेळा उन्हाळी भातशेती पिकविणे म्हणजे मोठेच कष्टाचे होऊन जाते. तर दोनच दिवसांपूर् आलेल्या चक्रीवादळाने तुफान कोसळलेल्या अवकळी पावसाने कापणीलायक झालेली भाताची कणसे जमिनदोस्त झाल्याने व काही ठिकाणी कापलेली करपे शेतात जास्त पाणी झाल्याने पाण्यावर तरंगल्याने शेतकरी वर्ग चांगलाच हवालदिल झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे. दिवसेंदिवस शेतमालाला म्हणावा तसा भाव मिळत नाही, महागाईने कंबरडेच मोडले आहे. शेती नाही पिकविली तर खाणार काय ? कारण बहुतांश शेतकरी कुटुंब ही शेतीवरच आपले उदरनिर्वाह करीत आहेत. अशावेळी भातशेतीचे उत्पादन घेण्यासाठी शेतकरीवर्ग उसनवारी करून किंवा कर्ज काढून भातशेती पिकवितो आहे. परंतू निसर्गच जर साथ देत नसेल तर काय करावे? असा यक्षप्रश्नही शेतकरी वर्गाला पडला आहे. सलग तीन वर्ष अवकाळी पाऊस शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करीत आहे. तर नुकत्याच झालेल्या नुकसानीचे शासनातर्फे लवकरात लवकर नुकसानग्रस्त भातशेतीचे पंचनामे करून शेतकरी वर्गाला जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळवून देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# विट्ठलवाडी परिसर झाला प्रकाशमय...

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या दोन दिवसामध्ये तौक्ते चक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यासह पनवेल तालुक्यासह ग्रामीण भागात मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये ठिकठिकाणी पडझड, झाडे कोसळले तसेच यामुळे काही ठिकाणी वीज वाहिन्यांवर झाडे पडली, तर काही ठिकाणी ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाला. होता. यामुळे ग्रामीण भागातील नागरिक अंधारात होते. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी लक्ष घातल्याने अखेर बिघाड झालेला रोहित्र मंगळवारी तात्काळ बसविण्यात आला. त्यामुळे परिसरात प्रकाशमय झाला.



ऊर्जा मंत्री नितीन राऊत यांनी विविध स्तरावर उपाययोजना करून वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आराखडा तयार केला होता. तसेच राज्यसह विविध ठिकाणावर सातत्याने परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. पनवेल तालुक्यातील विठ्ठलवाडी गावाला वीज पुरवठा करणारा रोहित्रामध्ये बिघाड होऊन बंद पडला होता. यावेळी हा रोहित्र दुरुस्त करण्यासारखा नव्हता, त्यामुळे करंजाडे, पारगाव, गव्हाण फिडरचे सहाय्यक अभियंता महावितरण अमित पालवे यांनी अतिशय मेहनतीने या विभागाचा वीज पुरवठा लवकरात-लवकर सुरु करण्यासाठी या विभागाचे सिनियर टेक्निशियन कैलास दमडे यांच्यासह नवीन रोहित्राची ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था करून अखेर विठ्ठलवाडी परिसर प्रकाशमय केला. यावेळी त्यांचे सहकारी अमोल फाळके, हेमंत पाटील, प्रवीण निर्मल, विक्रांत दापोलकर, प्रशांत गायकवाड, यांनी परिश्रम घेतले. विठ्ठलवाडी परिसर प्रकाशमय झाल्यामुळे सर्व नागरिक, रहिवासी यांच्याकडून महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांचे मनपूर्वक आभार मानले.



# सिडको एजन्सीमार्फत करणार द्रोणागिरी नोडमधील मुख्य रस्त्याचे बळकटीकरण/रिसरफेसिंग

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको संचालक मंडळाने, खासगी एजन्सीमार्फत खोपटा पूल ते आयओटीएल, सेक्टर-०१, द्रोणागिरी दरम्यानच्या ७.२ कि.मी. लांब व ३६ मीटर रुंद मुख्य रस्त्याचे बळकटीकरण/रिसरफेसिंग करण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर रस्ता हा द्रोणागिरी नोडमधील वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग असल्याने या रस्त्याचे बळकटीकरण केल्यामुळे प्रवाशांना फायदा होण्याबरोबरच जेएनपीटीकडे जाणाऱ्या व तेथून येणाऱ्या कंटेनरची वाहतूक सुरळीतपणे चालू राहण्यास मदत होणार आहे. या रस्त्याच्या बळकटीकरणामुळे द्रोणागिरी नोडमधील व जवळपासच्या गावांतील रहिवाशांचा प्रवासही सुलभ होणार आहे.

सामान्य प्रवाशांचा प्रवास सुलभ होण्याबरोबरच जेएनपीटीकडे जाणाऱ्या व तेथून येणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक सुरळीतपणे पार पडावी. या उद्देशाने सिडकोतर्फे द्रोणागिरी नोडमधील मुख्य रस्त्याचे बळकटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. द्रोणागिरी नोडमधील रहिवाशांकरिताही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

**डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# दोन ट्रेलरमध्ये चिरडल्या गेलेल्या पार्किंगमधील कामगाराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ट्रेलर चालकाने ४० फुटी ट्रेलर पार्क करताना निष्काळजीपणे ट्रेलर पाठीमागे घेतल्याने ट्रेलरच्या पाठीमागे उभा असलेला पार्किंगमधील कामगार दोन ट्रेलरमध्ये चिरडला गेल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल मधील मोठा खांदा गाव येथील पार्किंगमध्ये घडली. या घटनेनंतर सदर ट्रेलर चालक पळून गेला असून कामोठे पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला आहे.

पनवेल मधील मोठा खांदागाव येथे जेएनपीटी रोड लगत पार्किंग असून या पार्किंगमध्ये ट्रेलर व मोठी वाहने पार्क केली जातात. त्यासाठी सदर पार्किंगमध्ये कामगार ठेवण्यात आले आहेत. या पार्किंगमध्ये असलेले कामगार पार्किंगसाठी येणार्या वाहनांचे फोटो काढून सदर वाहने व्यवस्थीत पार्क करुन घेतात. ४० फुटी ट्रेलर या पार्किंगमध्ये आला होता. सदरचा ट्रेलर पार्क करण्यासाठी तेथील कामगार नयन पाटील (२०) हा ट्रेलर सोबत गेला होता. यावेळी नयन पाटील ट्रेलर चालकाच्या मदतीने ट्रेलर पार्क करुन घेण्यासाठी ट्रेलरच्या पाठीमागे गेला होता.

याचवेळी ट्रेलर चालकाने निष्काळजीपणे सदर ट्रेलर वेगाने पाठीमागे घेतला. त्यामुळे नयन पाटील हा पाठीमागे उभा असलेला ट्रेलर व पार्किंगसाठी आलेला ४० फुटी ट्रेलर या दोन्ही वाहनांमध्ये चिरडला जाऊन गंभीर जखमी झाला. हा प्रकार ट्रेलर चालकाच्या लक्षात आल्यानंतर त्याने याबाबतची माहिती तेथील इतर कामगारांना न देता आपल्या ताब्यातील ट्रेलर घेऊन त्याठिकाणावरुन पलायन केले.

यावेळी नयन पाटील हा त्याठिकाणी जखमी अवस्थेत पडल्याचे इतर कामगारांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी जखमी नयनला तत्काळ एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल केले. मात्र त्याठिकाणी उपचारादरम्यान, नयनचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कामोठे पोलिसांनी पळून गेलेल्या ट्रेलर चालकावर गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

# गोळेगणीतील जलकुंडाचे आ.गोगावले यांच्या हस्ते जलपुजन

## आंबा आणि काजूबागेला उन्हाळ्यात जलकुंड उपयुक्त





**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

डोंगर-उतारावरील आंबा आणि काजू फळबागांच्या पाणी व्यवस्थापनासाठी कोकणात जलकुंड तंत्रज्ञान कृषी विभागाच्यावतीने गोळेगणी तालुका पोलादपूर येथे नामदेव दगडु येरुणकर व सागर गोपाळ मोरे यांचे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना फळबागेची आ.भरत गोगावले आणि राजिपसदस्य चंद्रकांत कळंबे यांनी पाहणी केली. आ.भरत गोगावले यांच्याहस्ते यावेळी जलकुंडातील पाण्याचे जलपुजन करण्यात आले.

पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंअंतर्गत फळबाग लागवड पाहणी व शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उभारलेले जलकुंड पाहणी करताना आ.गोगावले यांच्यासमवेत राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, शिवार फेरी दरम्यान तालुका कृषी अधिकारी पोल-ादपूर कैलास धुमाळ, मंडळ कृषी अधिकारी सुरज पाटील, निंबाळकर, कृषी पर्यवेक्षक विजय निकम, सरपंच नितिन मोरे, माजी सरपंच प्रभाकर पवार, तंटामुक्ती अध्यक्ष अंकूश मोरे, नामदेव येरूणकर, शेखर येरूणकर, शरद मोरे, तुकाराम मोरे आदी शेतकरी, कृषी सहाय्यक मनोज जाधव, दत्तात्रय नरूटे, अनिल डासाळकर, विकास काकड, संतोष जाधव, संतोष मिसाळ आदी कर्मचारी उपस्थित होते.

प्रारंभी रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, जिल्हा नियोजन मंडळामार्फत जलकुंडाच्या योजनेचा पाठपुरावा केल्यानंतर आता उन्हाळ्यामध्ये या जलकुंडाची उपयुक्तता दिसून येत असल्याचे यावेळी सांगितले. यावेळी जननी रामेश्वर शेतकरी गट गोळेगणीचे जलकुंड लाभार्थी नामदेव दगडू येरूणकर, शेखर येरूणकर, सागर मोरे, मधुकर मोरे, बाळकृष्ण मोरे, नितीन मोरे आणि शेतकरी अविनाश येरूणकर, गणपत पवार, सुरेश मोरे, शरद मोरे, तुकाराम मोरे, दगडू मोरे, दीपक सुर्वे, अंकुश मोरे, दीपक मोरे, प्रवीण मोरे, राजेंद्र दळवी,अनिकेत मोरे, नवनाथ मोरे, दशरथ मोरे, प्रमोद भोसले आदींनी यावेळी आ. भरत गोगावले यांना संपूर्ण आंबा व काजू बागायतीची माहिती दिली. यावेळी तालुका कृषी अधिकारी कैलास धुमाळ यांनी, कोकणातील जांभ्या व लालमातीच्या जमिनीमध्ये पाण्याच्या निचऱ्याचे प्रमाण जास्त असते. या फळबागांना उन्हाळ्यात पाणी व्यवस्थापन करणे अवघड जाते. कोरडवाहू फळपिकांना प्रारंभिक तीन वर्षांच्या काळात सिंचनाची गरज असते, त्यामुळे फळबागांच्या सिंचनासाठी आता अस्तरिकरण शेततळ्याचा वापर फायदेशीर असलातरी शेत-तळ्याचे योजनेतील आकारमान पाहता कोकणातील बहुतांश ठिकाणी शेततळे जागेअभावी करण्याऐवजी केवळ १५ हजार रूपये खर्चाची जलकुंड निर्मिती केल्यास फळबागेसाठी जीवनदायी ठरेल तसेच खत व्यवस्थापन व कलमे छाटणी व्यवस्थित वेळेवर केली तर डोंगर दुर्गम भागात फळबाग उभारणीसाठी मदत होईल, अशी माहिती यावेळी आ.गोगावले यांना दिली. कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी या आंबा लागवडीसाठी विशेष मेहनत घेतली असून तालुका कृषी अधिकारी कैलास धुमाळ, मंडळ कृषी अधिकारी सुरज पाटील, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी सहकार्य केले.

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयात कोविड १९ आरोग्य प्रदर्शनाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आरोग्य मंत्रालय भारत सरकारच्या, राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेच्या वतीने पनवेल उपजिल्हा रुग्णालयात कोविड १९ आरोग्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य प्रदर्शनाचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख आणि राष्ट्रीय जनस्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेचे संचालक डॉ दीपक राऊत यांच्या हस्ते पार पडले.

या प्रसंगी राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेचे उपायुक्त डॉ धवल थोरात यांच्यासह सहसंचालक डॉ सुधीर वंजे, पनवेल महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी आणि उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ बी एस लोहारे उपस्थित होते.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून उपजिल्हा रुग्णालयात कोविड आजाराशी तपासणी संबधित येणारे नागरिक अथवा रुग्णांना कोविड १९ या आजारात काय काळजी घ्यावी ? आजार होऊ नये म्हणून काय उपाययोजना करावी, समाजात वावरतांना काय काळजी घ्यावी या विषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. हे प्रदर्शन केवळ कोविड आजाराशी संबंधित बाधित रुग्ण व लक्षणे असलेल्या नागरिकांना पाहण्यास ठेवण्यात आले असल्याचे उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ बी एस लोहारे यांनी सांगितले.